| MHJN050001442022 | नि. दि. दावा क्र.१३/२०२२<br>शेख मैनोद्दीन वि.<br>साजेदअली खान व इतर |
| --- | --- |

## <u>निशाणी क्र.५० वरील आदेश</u>

वादी तर्फे प्रस्तूतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दिलेला आहे.

२. वादीच्या अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे,

प्रतिवादी क्र.१ याने दिनांक ११/०७/२०२४ रोजी दिलेल्या अर्जाला वादी याने दिनांक २२/०८/२०२४ रोजी उत्तर दिले असून सदर उत्तरामध्ये दिनांक ३१/०१/२०२२ ऐवजी ३१/०१/२०२४ अशी तारीख नमुद केली आहे. सदर तारीख ही टायपिंगच्या चुकीमुळे झाली आहे. त्यामुळे दिनांक ३१/०१/२०२४ ऐवजी ३१/०१/२०२२ अशी तारखेची दुरूस्ती करणे कामी वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. सदरील अर्जावर प्रतिवादी क्र.१ ने त्याचे म्हणणे दिले आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, सदरील दुरुस्ती निश्चित कुठे करावयाची आहे, हे स्पष्ट होत नाही. करिता अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीचा अर्ज, प्रतीवादीचे म्हणणे व अभिलेखाची पाहणी केली. प्रस्तुत वादीच्या उत्तरामध्ये वादीने मागितलेली दुरुस्ती विचारात घेता सदरील दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असल्याचे दिसून येते. तसेच, त्या अनुषंगाने अभिलेखाचे अवलोकन केले असता, सदरील दुरुस्तीमुळे अर्जाचे उत्तराच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. तसेच, प्रतीवादीच्या बचावावर देखील कोणताही परिणाम होणार नाही.

५. एकंदरीत उपरोक्त केलेल्या विवचंनेचा साकल्याने विचार केला

असता, वादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. वादीने मागणी केल्याप्रमाणे अर्जाचे उत्तरामध्ये दुरुस्ती केल्यास अर्जाचे उत्तराच्या मुळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही, तसेच प्रतीवादीच्या बचावावर देखील कोणताही विपरीत परिणाम होणार नाही. वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचे मुळ कारण पुर्णपणे निकाली काढण्याकरीता, योग्य न्यायदानाच्या दृष्टीकोनातून त्याचप्रमाणे भविष्यातील इतर दावे, प्रतिदावे टाळण्यासाठी वर नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती अत्यंत आवश्यक असल्याचे दिसून येते. त्यामुळे खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने सदरच्या अर्जात नमुद केलेली दुरुस्ती आजपासून १४ दिवसांच्या आत करावी.

Digitally signed by VRUSHALI BABURAO DOMBE
Date: 2025.06.12 17:48:54 +0530

व्ही. बी. डोंबे

दि.१२/०६/२०२५

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
परतूर

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this P.D.F. file order are same word to word, as per original order."

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | M. D. Adhe |
| Name of Court | : | V. B. Dombe, |
| | | Civil Judge Jr. Dn., Partur. |
| Order dictated on | : | 12.06.2025 |
| Transcript ready on | : | Direct on Computer |
| Order Signed by | | |
| Presiding Officer on | : | 12.06.2025 |
| Order uploaded on | : | 12.06.2025 |

Digitally signed by MADHAV DEVIDAS ADHE
Date: 2025.06.12 17:50:50 +0530

(Madhav D. Adhe)
Stenographer Grade-3